सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २६ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## मला सभागृहात बोलू दिले जात नाही; राहुल गांधींचा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्लांवर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी अनेकदा सत्ताधाऱ्यांवर संसदेत बोलू देत नसल्याचा आरोप करतात. आता पुन्हा एकदा त्यांनी असाच आरोप केला आहे. जेव्हा-जेव्हा मी लोकसभेत बोलण्यासाठी उभा राहतो, तेव्हा मला बोलू दिले जात नाही. मी बोलण्यासाठी उभे राहिलो असता, ते बोलण्यापूर्वीच कामकाज तहकूब करतात, असा आरोप त्यांनी केला.



विरोधी पक्षनेत्याला बोलण्याची परवानगी असते. पण, जेव्हा जेव्हा मी बोलण्यासाठी उभा राहतो, तेव्हा मला परवानगी दिली जात नाही. सभागृह कसे चालते, हे मला माहित नाही. आम्हाला जे हवे आहे, ते बोलण्याची परवानगी दिली जात नाही. मी काहीही केले नाही, मी शांत बसलो होतो. गेल्या ७-८ दिवसांपासून मला बोलण्याची परवानगी नाही. विरोधी पक्षासाठी जागा नाही... फक्त सरकारसाठी जागा आहे. पंतप्रधान कुंभमेळ्याबद्दल बोलले, मलाही बोलायचे होते, पण त्यांना परवानगी नव्हती. सभागृह पूर्णपणे गैर-लोकशाही पद्धतीने चालवले जात आहे, असा आरोप राहुल गांधींनी केला.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधी यांना सभागृहाचे नियम पाळण्याचा सल्ला दिला होता. बिर्ला म्हणाले की, तुम्ही सर्वांनी सभागृहाचा दर्जा आणि शालीनता राखणे अपेक्षित आहे. सभागृहात अशा अनेक घटना माझ्या निदर्शनास आल्या आहेत, सदस्य आणि त्यांचे आचरण सभागृहाच्या उच्च परंपरेला अनुसरून नाही. त्यामुळे सभागृहाची प्रतिष्ठा पाळा. यावर राहुल गांधी यांना काही बोलायचे होते, मात्र सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. यानंतर राहुल गांधी बाहेर आले आणि सभागृहात बोलू दिले जात नसल्याचा आरोप केला.

## संतोष देशमुख हत्या: उज्ज्वल निकमांनी कोर्टासमोर उलगडला संपूर्ण घटनाक्रम

### पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६बीड**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सुनावणीला २० मार्च रोजी सुरुवात झाली असून आज या प्रकरणातील दुसरी सुनावणी कोर्टात पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी हत्या प्रकरणात सुरुवातपासून नेमकं काय घडलं आणि कोणत्या आरोपीचा काय रोल आहे, याची माहिती कोर्टासमोर मांडली. पवनचक्की कंपनीला मागण्यात आलेली खंडणी आणि नंतर झालेली सरपंच संतोष देशमुख यांची हत्या या दोन घटनांचा कसा संबंध आहे, हेदेखील निकम यांनी माहिती देताना सांगितलं आहे.




सुरक्षेच्या कारणास्तव वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना व्हीसीद्वारे कोर्टात हजर करण्यात आलं होतं.

कोर्टासमोर युक्तीवाद करताना उज्ज्वल निकम यांनी म्हटलं की, २९ नोव्हेंबर रोजी खंडणीबाबत महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. खंडणीसाठी विष्णू चाटेच्या कार्यालयात जी बैठक झाली त्या बैठकीला सर्व आरोपी हजर होते. वाल्मीक कराड याने जगमित्र या त्याच्या कार्यालयात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे खंडणी मागितली. त्यानंतर जेव्हा सरपंच संतोष देशमुख यांनी खंडणीला विरोध केला तेव्हा सुदर्शन घुले याने पवनचक्की कंपनीच्या वॉचमनला मारहाण केली. या मारहाणीनंतर तिरंगा हॉटेल इथं झालेल्या बैठकीत 'संतोष देशमुखला कायमचा धडा शिकवा' असं विष्णू चाटे याने सुदर्शन घुलेला सांगितलं. या संपूर्ण प्रकरणात वाल्मीक कराडने आरोपींना गाइड केलं, असा दावा निकम यांनी कोर्टात केला आहे.दरम्यान, आता हे प्रकरण आरोप निश्चितीसाठी तयार असल्याचं उज्ज्वल निकम म्हणाले. मात्र कागदपत्रे न मिळाल्याने आरोप निश्चित करण्यात येऊ नये, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे.

## 'लोगों की लूटने कमाई, साडी वाली दीदी आयी'

### कुणाल कामराचे आणखी एक गाणे, कुणाला केले टार्गेट?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

आधीच एका गाण्यावरून वाद तापलेला असताना आता स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराने नवीन गाणे शेअर केले आहे. या गाण्यातून त्याने नोकरदार वर्गाकडून आयकराच्या माध्यमातून वसूल केला जात असलेल्या पैशांबद्दलचा मुद्दा मांडला आहे.

एका स्टॅण्डअप कॉमेडी शोमध्ये कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल एक विडंबन गाणे गायले. या गाण्यावरून मोठा राजकीय धुराळा उडाला. त्यातून स्टुडिओची तोडफोडही करण्यात आली. हे सगळे प्रकरण तापलेलं असतानाच आता कुणाल कामराने नवीन गाणे शेअर केले आहे.

कुणाल कामराने त्या शोमधील दीड मिनिटांचा व्हिडीओ शेर केला आहे, ज्यात एक गाणेही आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याबद्दल कुणालने विडंबन



गीत लिहिले आहे, ज्यातून निर्मला सीतारामन या लोकांची कमाई लूटत असल्याचे म्हटले आहे. निर्मला सीतारामन यांना साडीवाली दीदी म्हणत कुणाल कामराने हे विडंबन गीत तयार केले आहे.

मुंबईतील खार पोलिसांनी कुणाल कामरा याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. खार पोलिसांनी कुणाल कामरा याला समन्सही बजावलेले आहे. पण, हजर होण्यासाठी कुणाल कामराने मुंबई पोलिसांकडे आठ दिवसांचा वेळ मागितला आहे.

कुणाल कामराचा द हॅबिटेट स्टुडिओमध्ये शो झाला होता. या शोमध्ये त्याने काही विडंबनात्मक गाणी सादर केली. त्यातील एक गाणे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दलचे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख न करताही त्याने एक गाणे सादर केलेले आहे.

वाद धुमसत असतानाच आता कुणाल कामराने केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांच्याबद्दल गाणे पोस्ट केले आहे. त्यामुळे गाण्यावरून भाजपकडून काय भूमिका मांडली जाणार हे बघावं लागेल.

## मिस्टर बिननी बाळासाहेबांची शिवसेना काँग्रेसच्या डस्टबिनमध्ये टाकली होती - एकनाथ शिंदेंची टोलेबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

विरोधक दररोज सकारात्मक गोष्टींकडे, विकासाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत आहेत. संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा विरोधकांकडून नेहमी मारल्या जातात. पण संविधानावर कारभार आम्ही करत आहोत. असं म्हणत महाविकास आघाडीच्या कार्यकाळात काय घडलं



त्याचा पाढाच एकनाथ शिंदेंनी विधान परिषदेत वाचला. तसंच उद्धव ठाकरेंवरही टीका केली.

एकनाथ शिंदे म्हणाले, मर्चंट नेव्हीच्या अधिकाऱ्याला मारताना कुठे होतं तुमच्या हातातलं संविधान? प्रदीप मोरेला मारलं तेव्हा संविधान कुठे होतं? केतकी चितळेला तुरुंगात डांबलं तेव्हा संविधान कुठे होतं? मलिष्काच्या गाण्यामुळे तुम्हाला पोटदुखी झाली तेव्हा संविधान कुठे होतं? हनुमान चालीसा म्हटली म्हणून राणा दाम्पत्याला तुरुंगात धाडलं तेव्हा संविधान कुठे होतं? खोट्या केसेस करुन देवेंद्र फडणवीसांना तुरुंगात पाठवण्याचं षडयंत्र रचलं तेव्हा कुठे होतं संविधान? उद्योजकाच्या घरासमोर बॉम्ब पेरताना कुठे होतं संविधान? वाझे हा काही लादेन नाही म्हणताना संविधान आठवलं नाही का? नारायण राणेंना अटक करताना संविधान आठवलं नाही का? कंगनाच्या ऑफिसवर बुलडोझर चालवला तेव्हा कुठे होतं संविधान? फडतू म्हणाले त्यांच्या पायाशी लोटांगण घालताना संविधान कुठे होतं? असे तिखट प्रश्न एकनाथ शिंदेंनी उपस्थित केले आहेत.संविधानचा गळा घोटला असं जे आता म्हणत आहेत त्यांनी या प्रश्नांची उत्तरं द्यायला पाहिजे. बरेच उद्योग आहेत ते आम्ही काढत नाही. ते बाहेर काढलं कोरं संविधान घेऊन कुठे पळावं लागेल तुम्हाला? आता हल्ली कुणीही येतो आणि संविधान दाखवतो. मी इतकंच सांगतो की कार्यकर्त्यांनी पेटवा मशाल आम्ही बंगल्यात झोपतो खुशाल ही पद्धत झाली आहे. बाळासाहेब ठाकरे कार्यकर्त्यांच्या मागे उभे राहिले होते म्हणून शिवसेना मोठी झाली. बोलताना, आरोप करताना काहीही बोलत आहेत. झाली ना अडीच वर्षे, कोण खरं आहे, कोण काम करतं आहे ते लोकांना समजलं आहे असं म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंनाही टोला लगावला.

## दिशा सालियन यांच्या कुटुंबियांनी केलेल्या आरोपांनंतर आदित्य ठाकरे राजीनामा देणारा का?- आ. संजय गायकवाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुबई**

मुंबईतील दिशा सालियान या तरुणीच्या मृत्यू प्रकरणावरून पुन्हा एकदा वातावरण तापलं आहे. दिशाच्या आई-वडिलांनी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन तिच्या हत्येत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांचा सहभाग असल्याचा आरोप केल्याने राजकीय खळबळ उडाली. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आज विधिमंडळात आदित्य ठाकरेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

दिशा सालियान हिचे वडील सतीश सालियान आणि तिच्या आईने काल पोलीस आयुक्तांची भेट घेऊन आमच्या मुलीच्या हत्या प्रकरणात आमदार आदित्य ठाकरे यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप केला आहे. संतोष




देशमुख यांच्या हत्येनंतर त्यांच्या हत्येत सहभागी असल्याच्या संशयावरून वाद झाल्यानंतर धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. आता तर दिशा सालियान हिच्या वडिलांनीच आदित्य ठाकरेंचा त्यांच्या मुलीच्या हत्येत सहभाग असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे आदित्य ठाकरे नैतिकता म्हणून राजीनामा देणार का? किंवा अध्यक्ष महोदय, आपण त्यांच्यावर काही कारवाई करणार का? असा प्रश्न आमदार संजय गायकवाड यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उपस्थित केला. त्यावर सरकारच्या वतीने मंत्री शंभूराज देसाई यांनी उत्तर दिलं.

दरम्यान, या प्रकरणाची एसआयटी करत असलेली चौकशी क्लोज केलेली नाही, असे आमचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत सांगितलं आहे. त्यामुळे दिशा सालियान यांच्या वडिलांनी पोलिसांकडे काही तक्रार दिली असेल, अधिकची माहिती दिली असेल, संशय व्यक्त केला असेल तर त्या सगळ्याचा अहवाल पोलिसांकडून अहवाल मागवला जाईल आणि ही माहिती एसआयटी चौकशीच्या माध्यमातून न्यायालयासमोर आणली जाईल, असंही शंभूराज देसाई यांनी सांगितलं आहे.

## सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये चढतांना यवतमाळ युवा उद्योजक निखिल सराफ यांचा अपघाती मृत्यू

### धामणगाव रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६धामणगाव रेल्वे**

येथील रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर चालत्या सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये चढतांना यवतमाळ येथील युवा उद्योजकाचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना मंगळवारला (ता.२६) रात्री अकरा वाजताच्या सुमारास घडली.मृतक उद्योगपतीचे नाव निखिल दिलीप सराफ (४५) असे आहे.युवा उद्योजकाच्या आकस्मिक मृत्यू बद्दल शोक व्यक्त करण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार असे की,यवतमाळ येथील उद्योगपती निखिल दिलीप सराफ हे सेवाग्राम एक्सप्रेसने मुंबई येथे जाण्यासाठी यवतमाळ येथून मंगळवारला (ता.२६) रात्री धामणगाव येथील रेल्वे स्थानकावर आले असता सेवाग्राम एक्सप्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर आली होती.यांचे रेल्वे आरक्षण ए - १ या डब्यात होते.परंतु चालत्या सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये चढतांना निखिल सराफ यांचा तोल गेला व गाडीच्या खाली आल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती मिळताच बडनेरा येथील जी.आर.पी.एफ मधील पोलीस कर्मचारी अनिता इंगळे व हरीश कुसराम यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला.मृतदेह येथील ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणी करीता आणण्यात आले होते.उत्तरीय तपासणीनंतर नातेवाईकांच्या सुपूर्द करण्यात आले.यवतमाळ येथे बुधवारला (ता.२६) दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.अधिक तपास बडनेरा येथील जी.आर.पी.एफ पोलीस करीत आहे.

## भाजपचे युवा खासदार अनुप धोत्रे यांनी दिल्ली येथे घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कुटुंबीयांसह भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अकोला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देश-विदेशात प्रचंड लोकप्रियता आहे. अनेक दिग्गज त्यांची भेट घेऊन चर्चा करण्यासाठी आतूर असतात. नरेंद्र मोदींना लहान मुलांची विशेष आवड. दिल्ली येथील पंतप्रधानांच्या निवासस्थानी नरेंद्र मोदी खासदारांच्या चिमुकल्यांशी गुफ्तगू करतांना रमल्याचे चित्र दिसून आले. निमित्त होतं ते कौटुंबिक भेटीचे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चिमुकल्यांना चॉकलेट देत, 'तुम्ही देशाचे भविष्य



आहात, खूप मोठे व्हा, यशस्वी व्हा' असे आशीर्वाद दिले.

अकोला लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे युवा खासदार अनुप धोत्रे यांनी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कुटुंबीयांसह भेट घेतली. यावेळी त्यांच्या पत्नी समीक्षा धोत्रे, कु. यशिका, चि. रणविजय व कु. राजनंदनी उपस्थित होते. संपूर्ण अकोला लोकसभा मतदारसंघाच्यावतीने खा.अनुप धोत्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सत्कार केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासदार अनुप धोत्रे यांच्यासोबत महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती, सामाजिक विषय, राज्यातील विकासात्मक कामे, शेतकऱ्यांचे प्रश्न, अकोला लोकसभा मतदारसंघातील मुद्दे यावर सविस्तर चर्चा केली. केंद्र सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा महाराष्ट्राला होत असलेल्या लाभाची देखील त्यांनी माहिती घेतली. केंद्र सरकारकडून जनतेच्या नेमक्या अपेक्षा काय आहेत? हे देखील त्यांनी जाणून घेतले. महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या कारभारावर सुद्धा चर्चा करण्यात आली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासदारांच्या चिमुकल्यांशी आपुलकीने संवाद साधला. चिमुकल्यांच्या आवडी-निवडी जाणून घेतल्या. पंतप्रधानांनी चिमुकल्यांना खाऊ देत त्यांचा लाड केला. खूप अभ्यास करा, मोठे होऊन देशहिताचे कार्य करा, असे पंतप्रधानांनी चिमुकल्यांना सांगितले.

## संपादकीय ......

# शेतीच्या सिंचनाचा प्रश्न बिकट

१९९५ मध्ये कोकण सिंचन पाटबंधारे महामंडळ स्थापन करून कोकणचे ४७ पाटबंधारे प्रकल्प या महामंडळाकडे सोपवण्यात आले. मात्र गेल्या ३० वर्षांत देवघर वगळता एकही पाटबंधारे प्रकल्प पूर्णत्वाला न गेल्याने तहानलेल्या कोकणला पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी वणवण वर्षागणिक वाढत आहे. यामुळे पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीच्या सिंचनाचा प्रश्न बिकट बनला आहे. कोकणचे शेती क्षेत्र सध्या ४० टक्के घटले असून फळ बागायतीसह भात शेतीत अग्रेसर असणारा कोकण शेती क्षेत्रात मागे पडत आहे. याची दखल आता तरी सरकार घेणार का, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

सिंधुदुर्गात टाळंबा, जामदा, सातरंडी, नरडवे, कुंभवडे असे महत्त्वाचे पाटबंधारे प्रकल्प निधीअभावी रखडलेले आहेत. रत्नागिरी, रायगड, पालघर जिल्ह्यांतही जवळपास २५ प्रकल्प रखडलेले आहेत. या सर्व अपुर्या राहिलेल्या प्रकल्पांमुळे कोकणच्या शेतीचा आणि त्याचबरोबर कोकणच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जटिल अवस्थेत आहे. एका बाजूला कोकणातील पाच हजार कोटींचे जलसिंचन प्रकल्प रखडलेले आहेत; तर दुसर्या बाजूला कोकणातील पाणी उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वळवण्यासाठी १४ हजार कोटींची योजना सरकारने तयार केली आहे. कोकणला ३ हजार ५०० मि.मी. पाऊस पडूनही फेब्रुवारीनंतर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो. ही अवस्था एका बाजूला आणि दुसर्या बाजूला पाणी वळवण्यासाठी नवे प्रकल्प तयार केले जात आहेत. सरकारी कारभाराचा हा विरोधाभास जनमानसाच्याच मुळावर येत आहे. खरं तर ज्या प्रकल्पांवर कोट्यवधींचा खर्च यापूर्वी झाला आहे, ते प्रकल्प पूर्ण केले जातील असे एका बाजूला सरकार सांगत आहे आणि दुसर्या बाजूला नवे प्रकल्प घोषित करत आहे. परिणामी जुने प्रकल्प कागदावरच राहात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकूण सरकारी अनास्थाही मूलभूत प्रकल्पांच्या मुळावर येत आहे.

कोकणात हापूस आंबा, वाडा कोलम, जांभुळ, चिकू, कोकम, काजू अशा फळांना राष्ट्रीय मानांकन दिले जात आहे. या पिकांचे वैशिष्ट्य यामुळे अधोरेखित होत आहे. परंतु या पिकांची लागवड करण्यासाठी आवश्यक पाणी मिळत नाही. यासाठी नियोजित केलेले पाटबंधारे प्रकल्प हे वर्षानुवर्षे पूर्ण होत नाहीत. या सरकारी कारभाराच्या अनास्थेचा फटका शेती विस्तारावर होताना दिसत आहे. नवे सरकार आले की नव्या योजना जाहीर होतात आणि जुने प्रकल्प गुंडाळले जातात, असेच काहीसे चित्र हे कोकणच्या पाटबंधारे प्रकल्पांबाबत पाहायला मिळत आहे. त्यामुळे वर्षानुवर्षाचे कोकणच्या पाटबंधारे प्रकल्पांचे दुखणे मागच्या पानावरून पुढे सुरू आहे. कोकण सिंचन महामंडळावर २०१४ मध्ये भ्रष्टाचाराचे आरोप झाले. रायगड जिल्ह्यातील बाळगंगा, कोंढाणे हे प्रकल्प त्यामुळे गुंडाळण्यात आल्यात जमा आहे. या प्रकल्पांच्या चौकशा जाहीर झाल्या. पण त्याचा कुठलाही अहवाल आलेला नाही. ज्यांच्यावर आरोप आहेत, तेच आज सरकारबरोबर आहेत. त्यामुळे आता तरी या प्रकल्पांना नवसंजीवनी मिळणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.एकूण कोकणातील पाणीटंचाईग्रस्त गावांची संख्या आता शेकड्यांतून हजारांवर गेली आहे. मुंबईसह महानगरांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी सिंचनाचे पाणी पिण्यासाठी द्यावे लागत आहे. पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाचे पाणी वसई-विरार, मीरा-भाईंदर या शहरांना द्यावे लागल्याने या जिल्ह्यातील १४ हजार एकर क्षेत्र सिंचनातून बाद झाले आहे. अशा शेतीवरील संकटामुळे कोकणची शेतीही अडचणीत येऊ लागली आहे. यावर एक धोरणात्मक निर्णय घेऊन काम करण्याची गरज आहे. कोकणात वाढते औद्योगिक प्रकल्प व त्यांना लागणारे पाणी यामुळे धरणातील पाण्याचा बराचसा भाग औद्योगिक प्रकल्पांना दिला जातो. परिणामी रायगड जिल्ह्यात सुमारे २० टक्के भात शेती क्षेत्र घटले आहे; तर दक्षिण कोकणात शेती करावी तर पाणी नाही, रोजगाराच्या संधी नाहीत म्हणून लाखो लोकांचे स्थलांतर मुंबईत झाले आहे. परिणामी कोकणातील खेड्यांमधील लोकसंख्या घटली आणि गावांमध्ये बंद घरांची संख्या वाढली आहे. या सर्व परिस्थितीवर योग्य निर्णय घेऊन उपाय शोधणे आता गरजेचे आहे.

# साहित्यिकांचा सन्मान ही अभिमानाची बाब - प्रविण पोटे पाटील

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्री रमाकांत कोलते 'साहित्यव्रती' ने सन्मानीत

### स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती पुरस्कार सोहळा




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती:** स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट, अमरावती यांच्यावतीने आयोजित २०२४ च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात यवतमाळ येथील ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि विचारवंत डॉ. रमाकांत कोलते यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या समारंभात प्रमुख अतिथी म्हणून मा. आमदार श्री प्रविण पोटे पाटील अध्यक्ष पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती, मा. श्री सुदर्शनजी गांग (जैन), मा. श्रेयसदादा पोटे पाटील उपाध्यक्ष पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, डॉ. रमेश अंधारे, श्रीमती अनुपमा उजगरे मुंबई, आणि डॉ. पी.एम. खोडके संचालक पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती उपस्थित होते.


साहित्यिकांचे विचार समाजाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतात. या पुरस्कार सोहळ्याचे हे अकरावे वर्ष असून मराठी साहित्य क्षेत्रात विविध लेखन प्रकारांसाठी साहित्यिकांना सन्मानित करण्याचा आमचा मानस आहे. विदर्भ आणि अमरावती जिल्ह्यातील साहित्यिकांचा सन्मान करणे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. साहित्य क्षेत्रातील कला गुणांना वाव देण्याकरिता आगामी काळात आणखी पुरस्कार वाढविणार असून याचा साहित्यिकांचे विचार प्रत्येकापर्यंत पोहचविण्यासाठी काम करणार असूनमराठी साहित्यिकांचे विचार केवळ लेखनाच्या मर्यादेत थांबू न देता ते प्रत्येकाच्या हृदयात रुजविले जातील, असा प्रयत्न सर्वांनी एकत्रितपणे केला पाहिजे असे प्रतिपादन श्री प्रविण पोटे पाटील यांनी यावेळी केले.

या पुरस्कार सोहळ्यात उत्कृष्ट कादंबरी, कथासंग्रह, काव्यसंग्रह, वैचारिक वाड्.मय आणि ललित वाड्.मय या विविध साहित्य श्रेणींमध्ये सन्मान करण्यात आला. अमरावती जिल्ह्यातील श्री विशाल मोहोड यांच्या 'कीड' या कादंबरीला उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार, जालना येथील श्री प्रभाकर शेळके यांच्या 'डबल ढोलकी' या कथासंग्रहाला उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार, आणि श्री तीर्थराज कापगते यांच्या 'मावळत्या गावाचे गाणे' या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्यसंग्रहाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमात, विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम' या ललित वाड्.मय ग्रंथाला आणि श्री विनोद राऊत यांच्या 'नामदेव ढसाळ यांची कविता: आस्वाद आणि चिकित्सा' या विचारसंग्रहाला विशेष पुरस्कार मिळाले. गोवा येथील श्री रमेश वंसकर यांच्या 'वार्या वार्या आंबे पाड' या बालकाव्यसंग्रहाने बालवाड्.मय श्रेणीत पुरस्कार मिळवला.तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रमाकांत कोलते सह अनेकांनी यावेळी आपले मत उपस्थितांसमोर व्यक्त करत आठवणींना उजाळा दिला.पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र होते. सोहळ्याच्या आयोजकांनी यावर्षी दोनशेहून अधिक प्राप्त ग्रंथांचे परीक्षण केले, आणि पुरस्कारांची घोषणा प्राचार्य डॉ. शोभा रोकडे यांनी केली. यावेळी पुरस्कार समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. अनुप्रिता देशमुख, प्रा. डॉ. कुमार बोबडे, प्रा. डॉ. पंकज वानखडे, श्री आर.एस. तायडे, डॉ. मंदा नांदूरकर, आणि एड. प्राजक्ता राऊत यांचे विशेष योगदान होते.

# उसाचा खोडवा ठेवणार असाल तर ह्या ६ गोष्टी करू नका; वाचा सविस्तर

कृषी विशेष



दि.२६विदर्भ प्रजासत्ताक २

राज्यातील एकूण ऊस क्षेत्रापैकी ३५ ते ४० टक्के खोडव्याचे क्षेत्र असूनही एकूण उत्पादनात खोडव्याचा हिस्सा फक्त ३० ते ३५ टक्के इतका आहे. म्हणून ऊस पिकाचे सरासरी उत्पादन वाढविण्यासाठी लागणीच्या उसाप्रमाणेच खोडव्याचे उत्तम व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

उसाची तोडणी ऑक्टोबर पासून एप्रिल/मे पर्यंत केली जाते. या उसाचा खोडवा ठेवला जातो. सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, जसजसा खोडवा राखण्यास उशीर होतो, तसतसे खोडव्याचे उत्पादन कमी होत जाते.


म्हणून १५ फेब्रुवारीनंतर तुटलेल्या उसाचा खोडवा ठेवू नये. पाडेगाव येथे झालेल्या संशोधनानुसार सप्टेंबर ते ऑक्टोंबर या कालावधीत तुटलेल्या उसाचा खोडवा ठेवल्यास अधिक उत्पादन मिळते.

तसेच आडसाली, पूर्वहंगामी व सुरु या हंगामातील तुटलेल्या ऊसाचा खोडवा ठेवल्यास पूर्वहंगामी उसापासून ठेवलेल्या खोडव्याचे अधिक उत्पादन मिळते.











**खोडवा ठेवताना या गोष्टी करू नयेत**

**पाचट जाळणे.**

रासायनिक खतांचा फोकुन वापर करणे.

पाचट शेता बाहेर काढणे.

बुडख्यांवर पाचट ठेवणे.

पाण्याचा अतिवापर करणे.

फेब्रुवारी नंतर उसाचा खोडवा राखू नये.

# दोन महिन्यात शहरातील १३ मुलींचे अपहरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती** गत दोन महिन्यात शहरातील १३ मुलींचे अपहरण झाले आहे. त्यापैकी ११ बालिकांचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांना सुखरुप त्यांच्या आई-वडिलांच्या स्वाधीन केले. परंतु अद्यापही २ बालिका बेपत्ता असून पोलीस त्यांच्या शोधात आहे.

अल्पवयीन मुला-मुलींच्या सुरक्षेकरीता पोलीस विभागासह अन्य सरकारी विभागही तत्पर आहेत. तसेच बालकांच्या बाजुने कठोर कायदेसुध्दा आहेत. तसेच बालकांचे अपहरण रोखण्याकरिता पोलीस विभागाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची स्थापना सुध्दा केली आहे. तरीसुध्दा गतदोन महिन्यात शहरातील १३ मुली आणि २ बालकाचे अपहरण झाले आहे. आयुक्तालयातील १० ठाण्यांतर्गत या सर्व घटना घडल्या असून पोलीस दप्तरी याची नोंद आहे.यासर्व घटना पाहता शहर पोलिसांनी अपहरणाच्या प्रत्येक गुन्ह्यात तपास करून दोन्ही मुलांचा शोध घेतला. तसेच ११ मुलींना शोधण्यास त्यांना यश आले. शोध घेतलेल्या १३ ही मुला-मुलांना पोलिसांनी त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. परंतु अद्यापही शहरातील दोन बालिका बेपत्ता असून पोलीस त्यांच्या शोधात आहे




# डिंक म्हणजे संजीवनी! उष्माघात, त्वचेचे विकार, डिहायड्रेशनच्या समस्येवर फायदेशीर, आहारात 'असा' करा उपयोग

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

डिंक म्हटलं तर उष्णतेचा पदार्थ. हिवाळा सुरु झाला की, आपल्या आहारात डिंकाचे प्रमाण वाढते. डिंकाच्या लाडूपासून ते त्याच्या अनेक पदार्थांची चव आपण चाखतो. उन्हाळ्यात डिंक खाणे म्हणजे शरीरातील उष्णता वाढवून घेणे. परंतु, डिंकामध्ये देखील अनेक प्रकार आढळतात. ज्यातला एक गोंद कटिरा. सध्या सोशल मीडियावर याचा अधिक प्रमाणात ट्रेंड सुरु आहे.

उन्हाळा सुरु झाला की, डिहायड्रेशनच्या समस्येला सामोरे जावे लागते. अशावेळी आपण काकडी, ज्यूस आणि इतर पेयांचा आपल्या आहारात समावेश करतो. परंतु, उष्माघात, त्वचेच्या समस्येवर आणि डिहायड्रेशनवर डिंक फायदेशीर ठरु शकते.शरीरातील पाण्याची कमरता भरुन काढण्यासाठी आपण हे डिंक खाऊ शकतो.उन्हाळ्याच्या दिवसात आपले पोट थंड आणि निरोगी ठेवण्यासाठी अधिक मदत करते. याला चव नसली तरी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे.

उन्हाळ्यात गॅस-सिडीटीमुळे मळमळ, छातीतही दुखते? ५ सोप्या टिप्स, अपचनाचे त्रास लगेच होतील कमी

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा

. उष्मघातापासून संरक्षण

डिंक हा नैसर्गिक आणि चिकट पदार्थ आहे. याला रात्रभर पाण्यात भिजवून ठेवल्याने ते जेलीसारखे तयार होते. आपण उन्हाळ्यात याचे सरबत किंवा दुधात मिसळून प्यायल्याने उष्माघातापासून आपले संरक्षण होईल.

२. पोटाला थंडावा मिळेल

डिंकामध्ये प्रथिने, फायबर, व्हिटॅमीन बी आणि कॅल्शियमसारखे अनेक पोषक घटक आढळतात. हे खाल्ल्याने आपल्या पोटाला थंड



ठेवण्यास खूप मदत होते. सकाळी लवकर हे पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जात्मक राहाता येते.

**३. पोटाची चरबी कमी होते**

उन्हाळ्यात आपल्याला सतत पाण्याची तहान लागते. अशावेळी आपल्या पोटात अन्न देखील जात नाही. अनेकदा वाढत्या वजनामुळे आणि पोटाच्या चरबीमुळे जीव नकोसा होतो. या काळात डिंक नियमितपणे खाल्ल्याने चरबी लवकर कमी होण्यास मदत होते. यात असणारे फायबर आणि पोषकतत्वामुळे पोट दिवसभर भरते. ज्यामुळे भूक कमी लागून चयापचय राखण्यासाठी फायदेशीर ठरतात.

**४. डिहायड्रेशनची समस्या**

डिंक पाण्यात भिजवून दररोज ते पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट राहाते. ज्यामुळे डिहायड्रेशनची समस्या टाळता येते. हे नियमितपणे खाल्ल्याने अपचन, अतिसार आणि चिडचिड यासारख्या समस्या उद्भवत नाहीत.

# शिवानीचं रौद्ररूप..! लोखंडी रॉडनं २ भावांना बेदम मारलं; भरचौकात राडा, ४०० लोक पाहत राहिले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ वर्धा -** विदर्भातील पहिली तृतीयपंथी वकील अन् जिल्हा आयकॉन असणाऱ्या शिवानी सुरकारनं रौद्ररूप दाखवून दोन भावंडांना रॉडने बेदम मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. बुधवारी रात्री १० च्या सुमारास धंतोली चौकात बॅचलर रस्त्यावर ही घटना घडली. या घटनेवळी चांगलाच राडा झाला. नागरिकांचीही मोठी गर्दी झाल्याचं दिसून आले.

नितीन प्रभाकर सोळंके, अजय सोळंके असं जखमींची नावे आहेत. शिवानी सुरकार हिला २२ मार्चपर्यंत पोलीस कोठडी कोर्टाने सुनावली आहे. शिवानी सुरकार हिने नितीन सोळंकेची दुचाकी पाडली. नितीनने हटकले असता तिने रॉडने डोक्यावर गळ्यावर मारले. त्याचा भाऊ अजय मध्यस्थीसाठी गेला असता त्यालाही रॉडने मारहाण करत जखमी केले. त्यानंतर घरात शिरून घरातील साहित्याची तोडफोड करत नुकसान केले. त्याशिवाय दाराला लाथा मारल्या तर दुचाकीचेही नुकसान केले.

**२ महिन्यापूर्वीचा वाद...**

नितीनची ओळख शिवानीसोबत ८ महिन्यापूर्वी झाली. दोघांत बोलचाल सुरू होती. त्यानंतर त्यांच्यात मैत्री झाली होती. २ महिन्यापूर्वी दोघांत वाद झाल्यानंतर ते एकमेकांशी बोलत नव्हते. १४ मार्चला स्वावलंबी मैदानात माय मॉर्निंग ग्रुपचा होळी कार्यक्रम होता. त्याठिकाणी शिवानीदेखील होती. नितीनने त्याचा मित्र धनंजय उईकेला घरी चलण्यास म्हटले, तेव्हा शिवानीने धनंजयला तू जायचे नाही असे म्हणत नितीनला शिवीगाळ केली होती.



**व्हिडिओ, फोटो व्हायरल**

शिवानी सुरकार आणि नितीन सोळंके यांच्या झालेल्या वादानंतर परिसरात जवळपास ३०० ते ४०० लोक जमले होते. उपस्थित नागरिकांनी आपापल्या मोबाईलमध्ये व्हिडिओ तयार केले. सध्या हे व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. काही वेळ वाहतूकदेखील खोळंबली होती.

**पोलिसांशी घातली हुज्जत**

घटनास्थळी शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांसह दाखल झाले होते. मात्र शिवानीच्या रौद्ररूपाने त्यांनाही सोडले नाही. थेट पोलिसांशी हुज्जत घातली. शिवीगाळ करून अश्लील कृत्य केले. यामुळे परिसरात रात्रीच्या सुमारास काही वेळ तणाव निर्माण झाला होता.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २६ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# वन्य प्राण्याच्या हौदसामुळे शेती पिकांच्या नुकसान भरपाईसाठी

# शेतकऱ्यांची मुख्यवनसंरक्षक कार्यालयावर धडक

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचा आंदोलनाचा ईशारा

### वनपाल वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या दिरंगाईत शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ नांदगाव खंडेश्वर** – तालुक्यातील शेतकरी वन्य प्राण्यांच्या हौदसामुळे हैराण झाले असून शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले झाले असतांना वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईचे शेकडो अर्ज नामंजूर झाल्याने शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचे नेतृत्वात मुख्य वनसंरक्षक कार्यालय धडक देऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील हरभरा पिकांचे नीलगाय व इतर वन्य प्राण्यांनी प्रचंड नुकसान केल्याने शेतकऱ्यांनि पीक नुकसानीच्या तक्रारी १९, २० व २१ फेब्रुवारी दरम्यान वनविभागाकडे ऑनलाईन व ऑफलाईन वनपरिक्षेत्र अधिकारी वडाळी यांच्याकडे सादर केल्या सदरहू झालेल्या नुकसाणीची पाहणी करून पंचनामे १० दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक असतांना २० ते १५ दिवस पंचनामे करण्याची शेतकऱ्यांनी वाट पाहली परंतु वन विभागाचे कर्मचारी २० ते २५ दिवस आले नसल्याने हरभरा पिक काढणीला आल्यामुळे शेतकऱ्यांनि पिकं काढून घेतली त्यानंतर वनविभागाचे कर्मचाऱ्यांनी पाहणी केली असता पीक आढळून आले नाही त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांचे तक्रार अर्ज नामंजूर केले याला संबंधित कर्मचारी जबाबदार



असल्याचा आरोप प्रकाश मारोटकर यांनी तक्रारीत करत सन २०२४ मधील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे पीक नुकसानीचे एकूण अर्जापैकी काही शेतकऱ्यांचे अर्ज मंजूर केले तर काही शेतकऱ्यांचे अर्ज १० दिवसाच्या आत प्राप्त न झाल्याने कॉम्प्युटर सिस्टिम नी रिजेक्ट केल्याने नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळाली नाही वास्तविक १० दिवसाचे आत अर्ज व पंचनामे सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित वनपालाची असून वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची हलगर्जीमुळे शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असल्याची तक्रार करीत सदर तक्रारीची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी शेतकऱ्यांनी मुख्य वनसंरक्षक बॅनर्जी यांच्या कडे केली यावेळी वनसंरक्षक विभागाचे संबंधित जिल्ह्यातील अधिकारी सुद्धा उपस्थित होते यावेळी शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर निलेश ईखार गोपाल बनकर सुनील गुल्हाने रितेश जाधव शुभम सावरकर अतुल मोरे अंकुश मुळे प्रदीप पोफळे लोकेश उडबगले योगेश राऊत सुनिल पवार मुरलीधर केशरखाने वीरेंद्र किंदरले निवृत्ती केसरखाणे काशिनाथ राऊत व अन्य शेतकरी उपस्थित होते.शेकडो शेतकरी वन्य प्राण्यांनी केलेल्या नुकसान भरपाई पासून वंचित असून याला वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल जबाबदार असून मुख्य वनसंरक्षक बॅनर्जी यांनी पाच दिवसांत चौकशी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे आदेश दिले असल्याचे प्रकाश मारोटकर यांनी सांगितले.

# कसे उडणार विमान ?

## एअरलाइन्सच्या साईटवर ना अमरावतीच्या बेलोरा विमानतळाचे नाव आले, ना तिकीट विक्री सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती** – बेलोरा विमानतळावरून ३१ मार्चला पहिले प्रवासी विमानोड्डाण होणार, अशी घोषणा राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. विमानतळावरील संपूर्ण यंत्रणा दिवसा विमानोड्डाणासाठी सज्ज आहे. डीजीसीएचा परवानाही मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातून अलायन्स एअरलाइन्सला विमानोड्डाण सुरू करण्यासाठी सेटअप उभारण्याचे पत्रही देण्यात आले. परंतु, अद्याप एअरलाइन्सच्या साईटवर ना अमरावतीच्या बेलोरा विमानतळाचे नाव आले, ना तिकीट विक्री सुरू झाली. कारण, त्यांचे विमानतळावर सेटअपच तयार झाले नाही. ते बघता खरेच ३१ मार्चला पहिल्या प्रवासी विमानाचे उड्डाण होणार की,

> कोणत्याही एअरलाइन्सला त्यांची प्रवासी विमान सेवा सुरू करण्याची असेल, तर किमान १५ दिवस लागतात. कारण, विमानोड्डाणाची सर्व सूत्रे हे एअरलाइन्सच्या हातात असतात. विमानतळ प्राधिकरण केवळ विमानतळ त्यांच्या स्वाधीन करत असते.
>
> **–गौरव उपश्याम, विमानोड्डाण तज्ज्ञ.**

नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.शासनाने घोषणा केली. परंतु, ही घोषणा एअरलाइन्सने केली नाही. एअरलाइन्सला सर्व तांत्रिक बारकावे जुळवावे लागतात. त्यामुळेच जोपर्यंत ती विमानोड्डाणाची घोषणा करत नाही, तोपर्यंत विमानोड्डाण शक्य नाही. पहिल्यांदाच प्रवासी उड्डाण असेल तर संपूर्ण सेटअप हा नव्याने उभारावा लागतो. यासाठी वेळ लागतो. ७२ आसनी विमान, विमानातील क्रू मेंबर्स, एअर होस्टेस, वैमानिक यांची नियुक्ती. त्याचप्रमाणे विमानतळावर कार्यालय, चेकइन, चेकआऊट, प्रवाशांचे बॅग्ज तपासणी करणारी यंत्रणा, सुरक्षा व्यवस्था, यासाठी लागणारे कर्मचारी अशी संपूर्ण व्यवस्था करावी लागते. चाचणी, तपासणी यशस्वी झाल्यानंतरच तिकिटांची विक्री सुरू होते, अशी माहिती विमानोड्डाण तज्ज्ञांनी दिली.

ही संपूर्ण व्यवस्था करण्यासाठी किमान १५ दिवसांचा कालावधी तर लागतोच. त्यामुळे जोवर एअरलाइन्स अधिकृतपणे विमानोड्डाणाची तिकीट जारी करणार नाही, तोवर काही खरे नाही. त्यामुळे आणखी काही दिवस विमानातून प्रवास करण्यास इच्छुक असलेल्या अमरावतीकरांना प्रतीक्षा करावी लागू शकते

# शेत मूल्यांकनाची १० टक्के कपात केलेली रक्कम देण्याची मागणी

## पुनर्वसित आदिवासी शेतकरी बांधवांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२६अमरावती**– धारणी तालुक्यातील मौजा मांगिया येथील पुनर्वसीत शेतजमीनीचे १० टक्के कपात करण्यात आलेली रक्कम उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परत करण्यात यावी. अशी मागणी लाभार्थी आदिवासी शेतकरी बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून केली आहे.

जिल्ह्यातील मांगिया या गावाचे मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा अंतर्गत शासनाने ३ नोव्हेंबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. यानुसार शेत मुल्यांकनाच्या एकुण

रक्कमेपैकी १० टक्के रक्कम कपात करण्यात आली होती. या विरुध्द उच्च न्यायालयात लाभार्थी मुन्शी मोतीराम राम कास्देकर व इतर लाभाथ्यर्थ्यांनी प्रकरण दाखल करण्यात आले होते. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२५ रोजी आदेश पारीत करण्यात आलेले असून सदर रक्कम परत करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. अन्यथा उपवनसंरक्षक, गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा यांच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी लालबा धांडे, लक्ष्मण धुर्वे, रामदास धुर्वे, रामचंद्र उईक, हिरामण भिलावेकर, रामा धिकार, राजू धिकार आदी उपस्थित होते.

### नियमाचे उल्लंघन होत असल्याचा आरोप

उपवनसंरक्षक गुगामल, वन्यजीव विभाग, चिखलदरा यांनी काही लाभार्थी यांच्या खात्यात रक्कम जमा केलेली असुन उर्वरीत खातेदार यांच्या खात्यात रक्कम जमा केलेली नाही. त्यामुळे उपवनसंरक्षक गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा हे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे तसेच जिल्हाधिकारी, अमरावती यांनी घेतलेल्या आदेशाचे उलंघन करीत असल्याचा आरोप या शेतकऱ्यांनी केला आहे. तसेच आदिवासी जातीतील पुनर्वसीत यांच्यावर सामाजिक आघात करीत आहे.

# आरटीईच्या प्रतीक्षा यादीतील प्रवेशांसाठी विद्यार्थ्यांना १ एप्रिलपर्यंत दिली मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती** – शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेतील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी १ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.आरटीई प्रवेशासाठी यंदा जिल्ह्यात २३५ शाळांमध्ये २ ४३० जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ८ हजार ८४१ अर्ज दाखल झाले होते. प्रवेशासाठी सोडतीद्वारे २ हजार ३९६ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर सोडतीद्वारे प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यापैकी १ हजार ६०० विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चित केला.

त्यामुळे रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिल्या टप्प्यात प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना १८ ते २४ मार्च या कालावधीत प्रवेश घेण्यास मुदत देण्यात आली होती. आतापर्यंत प्रतीक्षा यादीतील ७९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. नियमित आणि प्रतीक्षा यादी मिळून १ हजार ६७९ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. प्राथमिक संचालनालयाकडून शिक्षण प्रतीक्षा यादीतील प्रवेशांसाठी चार फेऱ्या




राबवण्याचे नियोजन आहे. त्यामुळे २ एप्रिलनंतर दुसऱ्या टप्प्यातील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी संधी दिली जाणार असल्याचे प्राथमिक शिक्षणसंचालनालयाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रिक्त जागांनुसारच पाठवण्यात येईल. मात्र, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई संकेतस्थळावरील अर्जाची स्थिती पाहणे आवश्यक आहे. पालकांनी प्रवेश मिळालेल्या पत्राची प्रत आणि आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून कागदपत्रांची तपासणी करून ऑनलाइन प्रवेश निश्चित करावा. प्रवेश निश्चित झाल्याची पावती घेऊन शाळेत जाऊन प्रवेश घेणे गरजेचे आहे. अन्यथा प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार नाही.

# हल्दीराम यांचे एक्सपायरी ताक विकणाऱ्या दुकानदारावर कारवाई करा

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा कचेरी परिसरात निदर्शने

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती**

हल्दीराम यांचे एक्सपायरी ताक विकणाऱ्या दुकानदारांवर अद्यापही कुठलीही कारवाई न केल्यामुळे जिल्हा कचेरी परिसरात बुधवार (ता.२६) रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात निदर्शने आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा अन्न व औषध प्रशासन मंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले. ११ मार्च २०२५ रोजी पत्रकार परिषद मध्ये पत्रकारांना एक्सपायरी ८ महिन्यापूर्वीचे असलेले हल्दीराम यांचे शितपेय



मसाला ताक देण्यात आले होते. हल्दीराम यांचे ताक पिल्याने तीन पत्रकारांना विषबाधा झाली होती त्यामध्ये दोन पत्रकारांना जिल्हा सामान्य रुग्णालय तब्बल चार दिवस चार करावे लागले होते. मात्र अद्यापही त्या दुकानदारावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. जिल्ह्यात अश्या प्रकारे एक्सपायरी तारीख संपलेले शितपेय विकणारी अनेक दुकाने आहेत. त्या सर्व दुकानाची तपासणी करून दोषी आढळणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्यात यावी.काही दुकानदार थोड्याश्या पैशांसाठी एक्सपायरी तारीख संपलेली औषधे विकून नागरीकांच्या आरोग्याशी खेळत आहे. त्यामुळे गोरगरीब नागरीकांना आपला जिव गमवावा लागतो. शहरात नुकतीच घडलेली घटना त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. एक आठवडा होवून सुध्दा अन्न व औषध प्रशासन विभागाने कुठलीही कारवाई केलेली नाही. या निषेधार्थ निषेध निदर्शने आंदोलन करण्यात आले. आंदोलनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्षनयन मोंढे, शहराध्यक्ष विक्रम ढोके,विनोद इंगळे, मंगल प्रहरचे संपादक सुधीर गणवीर, अर्चना रक्षे, सोमेश्वर जेवडे,संजय तायडे,नकुल नाईक, धनराज खर्चान,राजा वानखडे,नितीन मुळे,मिनाक्षी कोल्हे, उज्वल भालेकर, स्वप्निल सवाळे यांच्यासह बहुसंख्य पत्रकार उपस्थित होते.

# बिबट दिसल्यामुळे नागरिकांमध्ये दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मोर्शी** जवळच असलेल्या मायवाडी परिसरात माळू नदीच्या काठावर शेतातील नागरिकांना सायंकाळी सहा व नंतर पुन्हा आठ वाजता बिबट दिसल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या परिसरात बिबट असल्याचे प्रत्यक्ष नागरिकांनी पाहिले. या अगोदरसुद्धा हाच बिबट खेळ, गोरेगाव, मायवाडी, भाईपूर, सिंभोरा, येवती परिसरात जंगल खाली झाल्यामुळे दिसत आहे. रात्री अचानक छोटू ठाकूर या सोकाऱ्याला बिबट दिसला व त्यांनी लगेच पंकज विधडे व हितेश साबळे यांना फोन लावून कल्पना दिली. त्यानंतर त्यांनी वनविभागाला कळविले. तेव्हा लगेच वनविभागाचे कर्मचारी घेऊन दिंडोरे घटनास्थळावर दाखल झाले. परंतु रात्र झाल्यामुळे बिबटाचे ठसे पाहू शकले नाहीत. या अगोदरसुद्धा खेळ शिवारात बिबट आढळून आला होता. तसेच येवती शिवारातसुद्धा बिबट्याचे दर्शन झाले होते. जंगल खाली झाल्यामुळे बिबट हा इकडून तिकडे फिरत असल्याचे निदर्शनात येत आहे. नागरिकांनी बिबट असल्यामुळे सावधान राहावे, कारण या परिसरात दोन बिबट असल्याचे निदर्शनात आले आहे, असे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी यांनी सांगितले.

# कंत्राटदारास अडीच कोटींचा दंड, आमदार वानखडे यांची लक्षवेधी :१०५ गावे वाढीव पाणीपुरवठा योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती**

जिल्ह्यातील चार तालुक्यांतील १०५ गावे वाढीव पाणीपुरवठा योजना रखडल्याने या गावांतील नागरिकांना पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. या योजनेच्या कंत्राटदाराने काम पूर्ण करण्यात केलेली दिरंगाई यास कारणीभूत असल्याचे समोर आले असून त्याला प्रतिदिन ५५ हजार रुपये इतका दंड करण्यात आला आहे. आतापर्यंत त्याला २ कोटी ४५ लाख रुपयांचा दंड करण्यात आला. तिवसा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांनी विधिमंडळातलक्षवेधी सूचना मांडत अचलपूर, चांदूरबाजार,अमरावती तालुक्यातील १०५ गावे वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीवर लक्ष वेधले. यामध्ये तिवसा तालुक्यातील ४४ गावांचा समावेश आहे. वर्ष २०२२–२३ मध्ये ही योजना जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आली होती. मजीप्राने केलेल्या करारनाम्यानुसार ही योजना



जानेवारी २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु सद्यस्थितीत यायोजनेची भौतिक प्रगती ५२ टक्के व आर्थिक प्रगती ६० टक्के झालो आहे. योजना पूर्ण करण्यात कंत्राटदाराकडून भातकुली व दिरंगाई होत असल्याचे आमदार राजेश वानखडे यांनी सभागृहासमोर मांडले. मात्र या कंत्राटदाराविरुद्ध कारवाई करण्यात आली नाही.आमदार वानखडे यांच्या लक्षवेधीवर उत्तर देताना पाणीपुरवठा मंत्र्यांनी संबंधित कंत्राटदाराविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली असून त्याला प्रतिदिन ५५ हजार रुपये दंड करण्यात आल्याचे व आतापर्यंत २ कोटी ४५ लाख रुपये दंड आकारण्यात आल्याचे उत्तर दिले.

# खंडणीच्या गुन्ह्यात मनसे कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी केली अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६** मुंबई: परिसरातील कामगार पुरविणाऱ्या कंत्राटदाराच्या सुपरवायझरला धमकावत कंत्राटदाराच्या वडिलांचे अपहरण करत दादर येथील युनियन कार्यालयात नेत १० लाख रुपये मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आझाद मैदान पोलिसांनी अपहरण, खंडणीचा गुन्हा नोंदवत मनसे कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांना खंडणीच्या गुन्ह्यात अटक केली आहे. नवी मुंबईचे रहिवासी असलेले कंत्राटदार विजय पांडुरंग मोरे (४०) यांच्या तक्रारीनुसार, सोमवारी सकाळी साडेदहा वाजता फोर्ट येथील महात्मा गांधी रोड परिसरात कंपनीत काम करणा–या १७ कामगारांनी किरकोळ कारणातून काम बंद केले होते. कामगार सेनेचे चिटणीस सुजय ठोंबरे यांच्यासह मनोहर चव्हाण, सुनील राणे, अजय शिर्के आणि रोहित जाधव तेथे आले. त्यांनी मोरे यांच्या कंपनीचा सुपरवायझर सुजित कुमार सरोज (३६) यांना धमकावत मारहाण केली. तसेच मोरे यांच्या वडिलांना जबरदस्तीने गाडीत बसवून मनसे युनियन दादर कार्यालयात नेले. तेथे तडजोड करण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली. अखेर तक्रारदारांनी आझाद मैदान पोलिस ठाणे गाठून घडलेला प्रकार सांगितला.

# दुधात भेसळ करणाऱ्यांवर थेट मकोका लागणार

## बैठकीत अजित पवारांच्या कठोर सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मुंबई–** भाजप आमदार विक्रम सातपुते यांनी अधिवेशन काळात बनावट पनीरचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर राज्य सरकार ॲक्शन मोडवर आले असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत काल एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली आहे. दुधात भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना या बैठकीत अजित पवारांनी दिल्या आहेत. दूध आणि तत्सम अन्नपदार्थात होणारी भेसळ ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे लोकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. हे खपवून घेतले जाणार नाही. दूध आणि तत्सम अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश अजित पवार यांनी दिले आहेत.

नालॉग चीज हा पदार्थ राज्यात अनेक ठिकाणी नालॉग पनीर या नावाने विक्री होत असल्याबाबत तसेच सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे उघडकीस आलेल्या दूध भेसळीसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील समिती कक्षात मंगळवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

दुधातील भेसळ तपासण्यासाठी तातडीने प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा सुरू करावी, पनीरमध्ये नालॉग चीज असल्यास त्यासंबंधीची माहिती दुकानात दर्शनी भागात लावण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. दूध भेसळीसंदर्भात जनजागृती करण्यात यावी, भेसळी संदर्भात जनतेला तक्रारी नोंदवण्यासाठी टोल फ्री क्रमांक योग्य प्रकारे कार्यान्वित करावा, पोर्टल विकसित करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.दुधातील



भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये आणखी निधी देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

अन्न व औषध प्रशासन विभागातील अपुऱ्या मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी डेअरी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांची सेवा घेण्यात यावी, त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

सोलापूर दूधभेसळ प्रकरणातील आरोपी कोणीही, कोणत्याही पक्षाचे व कितीही मोठे असतील तरी त्यांना लवकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांना दिल्या.

# भाजप प्रवक्त्याला युएईतून धमकी, डिबेटमध्ये सहभागी न होण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२६नागपूर–** भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते अजय पाठक यांना संयुक्त अरब अमिरातहून धमकी देण्यात आली आहे. त्यांना मंगळवारी याबाबत फोन आला. त्यांनी सिताबर्डी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे.

अजय पाठक हे विविध प्रकरणांवर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत असतात. नागपुरात सोमवारी झालेल्या दंगलींबाबत एका डिबेटमध्ये ते सहभागी झाले होते. ते डिबेट संपल्यावर त्यांना अगोदर स्थानिक क्रमांकावरून धमकीचा फोन आला. त्यानंतर त्यांना ९७ असा 'कंट्री कोड'वरून फोन आला. जे तू बोलत आहे व करत आहे ते ठीक नाही.आता यापुढे तुझ्यासोबत ठीक होणार नाही, अशी समोरील व्यक्तीने धमकी दिली. पाठक यांना तीन–चार महिन्यांअगोदरदेखील धमकी आली होती. मात्र त्यांनी ती बाब गंभीरतेने घेतली नव्हती. मात्र सोमवार व त्यानंतर मंगळवारी आलेल्या धमकीच्या फोनमुळे त्यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना याची माहिती दिली. त्यानंतर सिताबर्डी पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी संबंधित अर्ज सायबर पोलीस ठाण्यात पाठविला आहे. पाठक यांनी पोलीस सुरक्षेचीदेखील मागणी केली आहे.

# स्नेहल जगताप यांचा ठाकरेंच्या शिवसेनेला अखेर जय महाराष्ट्र

## राष्ट्रवादी अजित पवार गटात आज प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६महाड –**



महाड विधानसभा मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटाकडून निवडणूक लढवलेल्या महाडच्या माजी नगराध्यक्षा तथा माजी आमदार माणिकराव जगताप यांच्या कन्या स्नेहल जगताप यांनी अखेर शिवसेना ठाकरे पक्षाला अखेरचा जय महाराष्ट्र केला आहे. काही दिवसांपासून त्या भाजप अथवा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा जिल्ह्यात जोरात रंगली होती.अखेर जगताप यांनी राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश केला आहे. नुकतेच स्नेहल जगताप यांचं कुटूंब सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी दाखल झालं होतं. त्यानंतर त्यांच्यामध्ये बंद दाराआड एक तासाहून अधिक वेळ चर्चा झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं होतं. त्यात आता स्नेहल जगताप यांनी राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश केल्याने या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. मात्र कोकणात परत एकदा ठाकरे गटाला धक्का बसला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत येथे हा अधिकृत पक्ष प्रवेश होणार आहे. काही दिवसांपूर्वीच स्नेहल जगताप यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची मुंबईत भेट घेऊन प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली होती. स्नेहल जगताप सध्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात आहे. शिवाय जगताप यांची भरत गोगावले यांचे कट्टर विरोधक म्हणून ओळख आहे.

एकीकडे भरत गोगावले यांच्याशी पालकमंत्री पदावरून सुनील तटकरे यांचे वाद सुरू असताना दुसरीकडे तटकरे यांच्याकडून भरत गोगावले यांचे कट्टर विरोधक असणाऱ्या स्नेहल जगताप यांना राष्ट्रवादीत प्रवेश दिल्याने नवा राजकीय संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. तर, दुसरीकडे ठाकरे सेनेला रायगडात पुन्हा एकदा खिंडार पडल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. सोबतच भरत गोगावले यांची आता डोकेदुखी देखील वाढणार असल्याचे सांगितलं

# राज्याला खरीप हंगामात कपाशीचे दोन कोटी पॅकेट्स लागणार

## इतर पिकांचे दर पडले : बियाणे विक्रेत्यांनी नोंदविली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६यवतमाळ–** खरीप हंगामात संपूर्ण विदर्भामध्ये लागवडीचे चित्र बदलण्याची शक्यता आहे. खुल्या बाजारात कापूस वगळता इतर सर्व पिकांचे दर कोलमडले आहे. किमान आधारभूत किमतीमध्ये सरकार कापूस खरेदी करेल या विश्वासावर शेतकरी कापसाची लागवड करण्याची शक्यता आहे. यातूनच बियाणे विक्रेत्यांनी गुढीपाडव्याच्या पर्वावर दोन कोटी पॅकेटस् (प्रत्येकी ४७५ ग्रॅम) कपाशी बियाण्यांची मागणी नोंदविली आहे. खरीप हंगामाला वेळ असला तरी बियाण्यांची नोंदणी तीन ते चार महिने आधीच करावी लागते. त्या दृष्टीने बियाणे निर्मिती करणाऱ्या कंपन्या बाजारपेठेतून मागणी नोंदवत आहे. त्यानुसार कंपन्या धोरणही ठरवीत आहे. सध्या याच पद्धतीने येणाऱ्या काळात कुठल्या बियाण्यांची मागणी अधिक राहील यानुसार नोंदणी केली जात आहे.

संपूर्ण राज्यात ३३० कंपन्या बियाण्यांची विक्री करतील. सुमारे दोन कोटी पॅकेटस् बियाणे लागतील. त्यानुसार याची



नोंदही करण्यात येत आहे. कापूस उत्पादक प्रांत म्हणून विदर्भाकडे पाहिले जाते.

या ठिकाणी कापसाचा पेरा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये १५ ते २० टक्के क्षेत्र कापसाखाली अधिक येण्याची शक्यता नियोजन विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. त्यानुसार कंपन्यांकडे बियाण्याची नोंदणी केली जात आहे.

### तुरीचे क्षेत्र वाढेल; सोयाबीनचे मात्र घटेल

येणाऱ्या हंगामात तूर लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल राहणार आहे. त्या दृष्टीने आंतरपीक म्हणून शेतकरी तुरीच्या बियाण्यांची मागणी मोठ्या प्रमाणात करीत आहेत. दुसरीकडे सोयाबीनचे दर कमालीचे घसरले आहेत. यामुळे येणाऱ्या हंगामात सोयाबीनचा पेरा १५ ते २० टक्क्याने कमी होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

**मक्याचे क्षेत्र वाढणार–** विदर्भात मका लागवड होत नसला तरी याचे उत्पादन अधिक होत असल्याने शेतकरी मका लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. यातून मक्याच्या बियाण्यांची मागणी विक्रेत्यांकडून नोंदविली जात आहे. एक नवे पीक विदर्भात पाहायला मिळणार आहे. याशिवाय इथेनॉल निर्मितीसाठी मक्याची मागणी होत असल्याने याला चांगला दर राहण्याची शक्यता आहे. संरक्षणाच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोठी व्यवस्था करावी लागणार आहे.

# कोल्हापूर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह वळीव पावसाचा दणका

## उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा

विदर्भ प्रजासत्ताक



**दि.२६कोल्हापूर–** जिल्ह्यात रात्री साडेनऊच्या सुमारास वळीव पावसाने दमदार हजेरी लावली. गेली काही दिवस उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला. तर रस्त्यावरील विक्रेत्यांची तारांबळ उडाली.

आजऱ्यात वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह सायंकाळी वळीव बरसला. बहिरेवाडी परिसरात गारांचा वळीव पाऊस प्रचंड झाला. पावसामुळे वीट भट्टी व्यवसायिकांची तारांबळ उडाली. वाऱ्यामुळे अनेक ठिकाणची झाडे उन्मळून तर झाडांच्या फांद्या मोडून पडल्या. शहरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. बहिरवाडी परिसरात गारांचा पाऊस झाला.सांगली जिल्ह्यात अनेक ठिकाणी वादळी पाऊस, सांगली मिरज रोडवरील झाडांच्या काही फांद्या पडल्याने वाहतूकीवर परिणाम, विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रकार, कुंडल विटा व वाळवे तालुक्यात ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडला.

# उद्धव ठाकरेंना दुसरा धक्का! संदेश कार्ले हाती घेणार धनुष्यबाण

## पक्षप्रवेश कन्फर्म

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अहिल्यानगर–** विधानसभा निवडणुकीत पानिपत झाल्यानंतर महाविकास आघाडीतील ठाकरे गटाची अवस्था सैरभैर झाली आहे. आतापर्यंत अनेक दिग्गज नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आहे. सध्याच्या राजकीय घडामोडी पाहता पक्षांतर अधिक वेगाने होत आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे ओढा वाढला आहे. आताही ठाकरे गटाला दुसरा मोठा धक्का अहिल्यानगरात बसणार आहे. काही दिवसांपूर्वी अहिल्यानगर शहरातील ठाकरे गटाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. आता नगर तालुक्यात



ठाकरे गटाला दुसरा धक्का बसला आहे. तालुक्यातील दिग्गज नेते माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले धनुष्यबाण हाती घेणार आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर नगर जिल्ह्यातील राजकारण बदललं आहे. एकेकाळी नगर शहरात तब्बल २५ वर्षे शिवसेनेचा आमदार होता. पण आता याच नगर शहरात शिवसेना कमकुवत दिसू लागली आहे. मागील काही दिवसांपूर्वी शहरातील जुन्याजाणत्या शिवसैनिकांनी मुंबई गाठून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. यानंतरही ठाकरे गटाला लागलेली गळती थांबलेली नाही.

उद्याच करणार करणार प्रवेश संदेश कार्ले यांचा शिंदे गटातील पक्षप्रवेश निश्चित झाला आहे. उद्या कार्ले त्यांच्या कार्यकर्त्यांसह मुंबईत येऊन एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश करतील. संदेश कार्ले नगर तालुक्यातील शिवसेनेचे फायरब्रँड नेते म्हणून ओळखले जातात.

नगर तालुका आणि आसपासच्या तालुक्यात त्यांचा जनसंपर्क चांगला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत कार्ले यांनी पारनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक देखील लढली होती. जिल्हा परिषद सदस्यपदाच्या माध्यमातून त्यांचा जिल्हा परिषदेतील कार्यकाळ उल्लेखनीय राहिला आहे.

# बांधकाम कामगारांना गुडन्यूज! १२ हजार रुपये पेन्शन मिळणार;

## कामगार मंत्री फुंडकरांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई–** राज्य सरकारने बांधकाम कामगारांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. बांधकाम कामगारांना त्यांच्या ६० वर्षे वयानंतर पेन्शन मिळणार आहे. राज्याचे श्रमविभाग तथा कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज विधिमंडळात याबाबत मोठी घोषणा केली. बांधकाम क्षेत्रातील कामगारांसमोर निवृत्तीवेतनाची मोठी समस्या होती. राज्य सरकारने या कामगारांचा सहानुभूतीने विचार केला.कामगारांचं आणि त्यांच्या कुटुंबियांचं भवितव्य सुरक्षित व्हावं यासाठी कामगारांना पेन्शन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज विधिमंडळ सभागृहात या निर्णयाची माहिती दिली. मंडळाकडे नोंदणीकृत बांधकाम कामगारांना दरवर्षी १२ हजार रुपये निवृत्तीवेतन देण्यात येईल, अशी घोषणा मंत्री फुंडकर यांनी केली.इमारत आणि अन्य प्रकारच्या बांधकाम व्यवसायातील कामगारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने १९९६ मध्ये कायदा केला होता. या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने सन २००७ मध्ये नियम तयार केले. या नियमांतर्गत सन २०११ मध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या मंडळात १८ ते ६० वर्षे या वयोगटातील कामगारांची नोंदणी केली जाते. असे मंत्री फुंडकर यांनी सांगितले.

# शक्ती कायद्याचा मसुदा केंद्रात धूळखात ! युती सरकारकडून पाठपुरावा नाही

## जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या : गुन्हेगारांना पाठबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६यवतमाळ : –** महिला –मुलींवरील अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी गृहमंत्री असताना शक्ती कायद्याचा मसुदा तयार केला. मागील चार वर्षांपासून तो केंद्राकडे पडून आहे. युती सरकारकडून कोणताच पाठपुरावा केला जात नाही, असा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेतून यवतमाळात केला.

**गुन्हेगारांना पाठबळ**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी विदर्भात माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी मंत्री अनिल देशमुख दौरा करत आहेत. या अनुषंगाने त्यांनी गुरुवारी यवतमाळमध्ये पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांपुढे राज्यातील एकूणची स्थिती मांडत सरकारच्या धोरणावर संताप व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष वर्षाताई निकम, बाबासाहेब गाडे पाटील, अशोक घारफळकर, अजहर फारूखी, भावना लेडे उपस्थित होते.

**संरक्षणातून पसार–** छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे, माँ जिजाऊ यांचा अवमान करणाऱ्या व्यक्तीच्या घराला पोलिस संरक्षण दिले जाते. पोलिस संरक्षणातूनच ही व्यक्ती पसार होते. दोन समाजात वाद निर्माण होईल, अशी वक्तव्य राज्यातील मंत्री सातत्याने करत आहेत.



### जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या

शेतकऱ्यांना निवडणुकीच्या काळात देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. इतकेच नव्हे तर लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा केली.


यापैकी एकाचीही पूर्तता केली नाही. शेतमालाचे भाव पडल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. एकही हमीभाव केंद्र सुरू नसल्याने शेतमाल पडलेल्या दरात विकावा लागत आहे.

# १३ एप्रिल रोजी निशुल्क पशु शल्यचिकित्सा शिबिर

## गोकुलम गौरक्षण संस्थेचे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ अमरावती

स्वस्ती श्री त्रिवेणी फाउंडेशन मुंबई जनकल्याण ग्रुप मुंबई गोकुलम गौरक्षण संस्था नांदुरा बु.ता.जि.अमरावती महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यामानाने भव्य पशु शल्यचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये पशु वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, अकोला व पशुसंवर्धन विभागाचे तज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत तरी सर्व पशुपालक व गोपालकांना सुचित करण्यात येते की रविवार दिनांक १३/४/२०२५ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० पर्यंत गोकुलम गौरक्षण संस्था नांदुरा येथे आपल्या आजारी पशुसह उपस्थित रहावे. सदर शिबिरामध्ये खालील प्रमाणे तांत्रिक कामे करण्यात येतील. शल्यचिकित्सा शिबिरामध्ये शस्त्रक्रिया विभाग,प्रशुप्रजनन



विभाग,औषधोपचार विभाग या विभागातून पशुंवर उपचार करण्यात येणार आहे. यामध्ये शिंगाचा कॅन्सर, हर्निया,डोळयाचा कॅन्सर,शेपटीचा कॅन्सर,पोटातून प्लास्टिक काढणे, रिंगणेचे ऑपरेशन, कुत्र्यांचे व मांजरीचे इतर ऑपरेशन तसेच घोड्याचे जेल्डिंग ऑपरेशन गाई म्हशीची गर्भ तपासणी,वंधत्व तपासणी,वारंवार उलटणाऱ्या गाईची तपासणी,आजारी जनावरांचे रोग निदान व उपचार तज्ञ वैद्यकीय मंडळींकडून करण्यात येणार आहे. तरी या भव्य शिबिराचा लाभ सर्व गोपालक व पशुपालकांनी घ्यावा असे आवाहन गोकुलम गौरक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिरात पशुपालकांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच सर्व पशुंसाठी चाऱ्याची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. नोंदणी धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. शस्त्रक्रिया करिता जनावरे एक दिवस अगोदर रात्री ७.०० वाजता उपाशी ठेवावे व गोकुलम गौरक्षण संस्थेत उपचारासाठी दाखल करावे याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी संपर्क डॉक्टर चंद्रशेखर गिरी – ९३७१२९४३९१, वीरेंद्र कोरे – ९३२५१२४८९१ अभिषेक मुरके– ९६६५११३१११

# वलगाव पोलीस स्टेशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ अमरावती

अमरावती शहर पोलीस आयुक्त हद्दीत असलेल्या वलगाव पोलीस स्टेशनच्या वतीने मंगळवार दिनांक २५ रोजी सिकची मंगलम येथे मुस्लिम समाजातील पावन आणि पवित्र समजल्या जाणाऱ्या रमजान निमित्त मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते रमजान या महिन्यात मोठ्या आस्थेने व श्रद्धेने लहान मुलं मुली पुरुष महिला उपवास करत असतात रमजान महिन्यात




पाच वेळेस फर्ज नमाज पठन केल्या जाते सोबतच एक वेळेस तराबी नमाज सुध्दा पठन केल्या जाते रमजान या महिन्यातच हजरत मुहम्मद पैगंबरांना त्याच्या अखंड साधनेचे तपश्चर्याचे फळ प्राप्त झाले होते रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे हा महिना अत्यंत पवित्र आणि मंगलमय मानला गेला आहे यावेळी वलगाव पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गावातील सरपंच उपसरपंच तंटामुक्ती अध्यक्ष पोलीस पाटील यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती यावेळी वलगाव पोलीस स्टेशन येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव पानसरे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे पोलीस उपनिरीक्षक विश्वजीत सरनाईक सुनील अवसरमोल गणेश बाभुळकर रविंद्र खेडेकर प्रदीप सावरकर संजय गुलवाडे दादु दहिकर आरती मामनकर पोलीस कास्टेबल अब्दुल कलाम अजहर अहमद तौसीफ अली अबरार शाहा समीर शेख रवी भैसे संदीप विजयकर शेषराव नेमाने किरण पाटे निलेश घाटे निवासराव घुगे अतिश कोकाटे श्रीकृष्ण भांगे अंबादास मोहोळ सागर काकने नंदकिशोर नेहारे संजय काळे महादेव कास्देकर प्रमोद खोपे महेंद्र वानखडे राजेश यादव अनकेश शिरसाट अनिता बेलसरे किरण शिरभाते यांच्यासह गावातील प्रतिष्ठित व्यक्ती प्रामुख्याने उपस्थित होते.

# आता व्हॉट्सप क्रमांकावरून जाणून घेऊ शकता तहसील कार्यालयात दाखल अर्जाचे अपडेट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६तिवसा

शासकीय कामकाजासाठी तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारून सर्वसामान्य नागरिकांचा वेळ व पैसा खर्च होतो; परंतु यापुढे अर्जदारांना आपल्या दाखल अर्जाची माहिती मिळविण्यासाठी कार्यालयाचे उंबरठे झिजविण्याची गरज नाही. त्यासाठी तहसील प्रशासनाने शासकीय व्हॉट्सॲप क्रमांक प्रसारित केला असल्याने आता नागरिकांना



घरबसल्या आपल्या अर्ज तक्रार व सूचनेच्या सद्य:स्थितीची माहिती प्राप्त होणार आहे.

तहसील कार्यालयात सोमवारी उपविभागीय

> शेतकरी खातेदारांनी वहिवाटीच्या रस्त्यावरून वाद न घालता सलोख्याने राहावे. शेतरस्त्याची प्रत्येक शेतकऱ्याला गरज असल्याने परस्परांमध्ये समन्वय ठेवून एकमेकांना सहकार्य करावे.
> **– आशिष नागरे, नायब तहसीलदार (महसूल)**

अधिकारी मिन्नू पी.एम. यांच्या हस्ते जनतेच्या सोयीसाठी प्रसारित करण्यात आलेल्या ९३०७४९६१४८ या व्हॉट्सॲप क्रमांकाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी तहसीलदार डॉ. मयूर कळसे, नायब तहसीलदार आशिष नागरे, नरेंद्र कुरळकर, प्रशांत देशमुख व कर्मचारी उपस्थित होते. शेतीच्या वहिवाटीच्या रस्त्यावरून, बांधावरून उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण व्हावे व शेतकऱ्यांना उचित माहिती प्राप्त व्हावी, यासाठी महसूल विभागाच्या दालनासमोर अर्जाच्या नमुन्यासह इत्थंभूत माहिती असलेला फलक लावण्यात आला आहे. १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असून, यामध्ये गुंतवणूक प्रसार, अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, ई-ऑफिस व 'एआय'बाबत प्रशिक्षण, आरोग्य व रक्तदान शिबिर, तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबांना समुपदेशन होणार आहे. नागरिकांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांनी केले.

# भारतीय बौद्ध महासभा विज्ञान निष्ठ धम्म मांडते : कैविषताई मेश्राम

## दहा दिवसीय शिबिरांचा सांगता समारंभ तथा धम्म मेळावा उत्साहात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६बडनेरा

भारतीय बौद्ध महासभा विज्ञान निष्ठ धम्म आपल्यापुढे मांडते. महिलांची स्वतंत्र शाखा गठीत करण्याची संधी भीमराव आंबेडकरांनी उपलब्ध करून दिली आहे. रमाईचा त्याग सांगणे सोपे आहे. परंतु त्या दिशेने कार्य करणे कठीण आहे.मात्र ते आपण केले पाहिजे, कारण बाबासाहेबांचा वारसा आपल्याला पुढे घेऊन जायचं आहे. बाबासाहेब आंबेडकर आता पुन्हा आपला उद्धार करण्यासाठी येणार नसल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेच्या राज्य संघटिका तथा केंद्रीय शिक्षिका कैविषताई मेश्राम यांनी केले.भारतीय बौद्ध महासभा शाखा बडनेरा व तालुका



नांदगाव खंडेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान समर्थक समाज जोडो अभियानांतर्गत १० दिवसीय धम्म उपासिका-उपासक प्रशिक्षण शिबिराचा समारोप समारंभ व धम्म मेळावा मंगळवार(ता.२५ मार्च) रोजी सार्वजनिक कपिल मंडळ सभागृह,अशोक नगर,नवी वस्ती बडनेरा येथे मोठ्या उत्साहात पार पडला.धम्म मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य संघटक विजयकुमार चौरपगार, राज्य संघटिका तथा केंद्रीय शिक्षिका कैविषताई मेश्राम,जिल्हा सरचिटणीस गणपत तिडके, कोषाध्यक्ष डॉ. प्रमोद भालेराव, नांदगाव खंडेश्वर तालुकाध्यक्ष मदन खंडारे उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून भदंत नागसेनमहिला आघाडी शहराध्यक्ष माया धांडे, बडनेरा शहराध्यक्ष संगीता बागडे, बडनेरा शहराध्यक्ष शांताराम गेडाम, चंद्रपूर येथील केंद्रीय शिक्षिका मंगेशकर, वर्धा येथील केंद्रीय शिक्षिका निर्मला गुजर, नागपुर येथील केंद्रीय शिक्षिका इंदिरा घरडे, जळगाव येथील केंद्रीय शिक्षका सुमित्रा सरवटकर, नागपुर येथील केंद्रीय शिक्षिका माला बर्डे, वर्धा येथील केंद्रीय शिक्षिका रमा सोनपितळे, अनिता कांबळे धम्मपिठावर विराजमान होत्या.

कैविषताई मेश्राम पुढे म्हणाले की, सुर्यपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांनी धम्म संस्काराकरिता भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून संस्कार शिबिराची सुरुवात केली.आजही आंबेडकरी कुटुंब धम्मकार्यात अग्रेसर आहे. तुमच्या गावातील शिबिरे पार पडली, आता इथून पुढे सांगितल्या प्रमाणे केले नाही तर येरे माझ्या मागल्या असे होवू नये. भारतीय बौद्ध महासभेची ही चळवळ घराघरात पोहचली पाहिजे. बाबासाहेबांची मातृसंघटना डोक्यात घेऊन पुढील वाटचाल करण्याचे आवाहन यावेळी केले.धम्म मेळाव्याचे प्रास्ताविक समता सैनिक दलाचे विलास नागदिवे यांनी केले. संचालन कार्यालयीन सचिव राहुल शेंडे तर आभार समता सैनिक दलाच्या महिला प्रमुखवंदना रहाटे यांनी मानले.

# रेल्वेत निघाली बंपर लोकोपायलट भरती; ९९७० जागा भरणार, १० वी पास, खढख वाले, तुम्ही करू शकता अर्ज

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई

रेल्वे खात्याने मोठी भरती जाहीर केली आहे. साध्या सुध्या पदासाठी नाही तर रेल्वे इंजिने चालविणाऱ्या लोको पायलट पदासाठी ही भरती काढण्यात आली आहे. आरआरबी असिस्टंट लोकोपायलट या पोस्टसाठी तब्बल ९९७० जागा भरल्या जाणार आहेत. महत्वाचे म्हणजे रेल्वेने अर्जाच्या तयारीसाठी १५ दिवसांचा वेळ दिला आहे, त्यानंतर अर्ज प्रक्रिया सुरु होणार आहे.

Railway ALP Recruitment 2025 साठी अर्ज भरण्याची प्रक्रिया १० एप्रिलपासून सुरु होणार आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ही ९ मे असणार आहे. या काळात उमेदवार त्यांची कागदपत्रे तयार



करू शकणार आहेत. वेगवेगळ्या झोनसाठी ही भरती असणार आहे. १० वी पास उमेदवार या भरतीसाठी अर्ज करू शकणार आहेत. याचबरोबर त्यांच्याकडे एनसीव्हीटी/एससीव्हीटी, फिटर, इलेक्ट्रिशियन, इन्स्ट्रुमेंट, मेकॅनिक, मिलराईट, मेंटेनन्स मेकॅनिक, मेकॅनिक रेडिओ आणि टीव्ही, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक मोटर व्हेईकल, वायरमन, ट्रॅक्टर मेकॅनिक, आर्मेचर आणि कॉइल वाइंडर, मेकॅनिक डिझेल, हीट इंजिन, टर्नर, मशिनिस्ट यापैकी एखाद्या अभ्यासक्रमाचा आयटीआय डिप्लोमाचे प्रमाणपत्र असायला हवे.

सध्या रेल्वे एएलपीच्या १८७९९ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. सीबीटी-खख परीक्षा पूर्ण झाली आहे. निकाल लवकरच जाहीर होईल. दरम्यान ही नवीन भरती देखील आली आहे.

वय, शैक्षणिक अर्हता आणि इतर गोष्टी तुम्ही या लिंकवर पाहू शकता. रेल्वेने लहान नोटीफिकेशन जारी केले आहे. डाऊनलोड करण्यासाठी इथे क्लिक करा... RRB ALP Recruitment 2025 Short Notification PDF

वयोमर्यादा – किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय ३३ वर्षे असावे.

निवड प्रक्रिया- लेखी परीक्षा, कागदपत्रांची पडताळणी, वैद्यकीय चाचणी इत्यादी टप्प्यांच्या आधारे उमेदवार निवडले जाणार आहेत.

# संजय गांधी निराधार, श्रावण बाळ योजने अंतर्गत लाभार्थ्यांची थकीत रक्कम द्यावी

## महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार प्रताप अडसड यांची मागणी



विदर्भ प्रजासत्ताक
दि. २६ धामणगाव रेल्वे

संजय गांधी निराधार,श्रावण बाळ योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांना होत असलेल्या अडचणी संदर्भात आमदार प्रताप अडसड यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. संजय गांधी निराधार,श्रावण बाळ योजने अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांचे मानधन मिळाले नसल्याने गरजा भागविणे कठीण झाले आहे. लाभार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी बँकेत जावे लागते. बँकांमध्ये गेले तर पैसे आले नाहीत,असे उत्तर दिले जाते. तहसील कार्यालयात जाऊन विचारा असे म्हटले तर नाईलाजाने आपल्या घरी रिकाम्या हाताने परत यावे लागते. महिन्यात दोन-चार चकरा माराव्या लागतात. मात्र, निराधार लाभार्थ्यांचे मानधन काही बँकेत जमा केले जात नाही. विशेष म्हणजे, शासनाकडून मिळत असलेल्या रकमेच्या भरवशावर लाभार्थ्यांना महिनाभर सांभाळून खर्च करावा लागतो. उसनवारी करून दवाखाना,औषधोपचार करावा लागत आहे.याची दखल घेत निराधारांची ही अडचण दूर करण्यात यावी,लाभार्थ्यांचे थकीत असलेले पैसे वळते. अशी मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार प्रताप अडसड यांनी केली.

# उद्या धामणगाव आयटीआयमध्ये रोजगार भरती मेळावा

विदर्भ प्रजासत्ताक
धामणगाव रेल्वे

संत बगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे (आयटीआय) येथे रोजगार भरती मेळाव्याचे आयोजन उद्या गुरूवार (ता. २७) सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते होणार आहे. तर विशेष अतिथी म्हणून संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा उद्योजक हेमंतकुमार जाधव, संस्था व्यवस्थापन समिती सदस्य अजय ठाकूर, हिंगणगाव कासारखेडा ग्रा.पं. सरपंच दुर्गाबक्षसिंग ठाकूर यांची उपस्थिती राहणार आहे. सदर मेळाव्यात विविध खाजगी कंपनींचे प्रतिनिधी येणार असुन ते मुलाखत घेऊन उमेदवारांची निवड करणार आहे. तरी आयटीआय, पदवी, पदविका पात्रता धारक उमेदवारांनी रोजगाराच्या या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य ए. डी. वाळके, कार्यकारी प्राचार्य प्रफुल्ल धोटे तथा सर्व शिल्पनिदेशकांनी केले आहे.

# मोर्शीच्या अप्पर वर्धा धरणात ५२ टक्के जलसाठा शिल्लक

## ना भारनियमन, ना तांत्रिक दोष तरीही सहा दिवसआड पाणीपुरवठा का?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीचे आयुर्मान संपल्याचे रडगाणे गाणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे लाखो नागरिकांना पाण्यापासून वंचित ठेवत आहेत. अलीकडे ना भारनियमन, ना जलवाहिनी फुटली तरीही सहा दिवसांनी पाणीपुरवठा करण्याचा डाव अधिकारी रचत आहेत. तर दुसरीकडे मोर्शीच्या अप्पर वर्धा धरणात ५२ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती आहे.

मजीप्रात अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोठा लवाजमा असताना अमरावतीसह बडनेरा शहरात गत काही महिन्यांपासून नियमित पाणीपुरवठ्याला फाटा दिला जात आहे. दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की, पाण्याचा वापर वाढतो, हे सर्वश्रुत आहे. याचा बागुलबुवा



करून मजिप्राचे अभियंते जबाबदारीतून हात झटकत असल्याचे दिसून येते. नियमित पाणीपुरवठा करू अशी शेलकी मिरवणारी मजिप्राचे अभियंते आता सहा दिवसांनी पाणीपुरवठा करीत असल्यामुळे ते कसे कर्तव्य बजावत आहे, हे दिसून येते. अप्पर वर्धा धरणातून मुख्य जलवाहिनीद्वारे अतिरिक्त पाणी ओढले तर ती फुटेल असा स्वतःहूनच अंदाज मजिप्राचे अभियंते बांधत आहेत. तथापि, पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याऐवजी दिवसाआड तर दूरच आता सहा दिवसांनी नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

### दरवर्षीच येतो उन्हाळा...

उन्हाळ्यात कुलर, झाडांना पाणी, वाहने धुण्यासाठी पाण्याचा वापर वाढल्याचे अधिकारी सांगतात. मात्र, उन्हाळा हा दरवर्षीच येतो, याचा विसर या अभियंत्यांना पडल्यानेच यंदा सहा दिवसांनी पाणीपुरवठ्याचा प्रताप मजिप्राने केला आहे.

### पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक केव्हा?

अमरावती, बडनेरा शहरांत मजिप्राकडून पाणी पुरवठ्याचे नियोजनच नाही. कधी रात्री १२, तर कधी १ वाजतानंतर पाणीपुरवठा केला जातो. वेळापत्रक निश्चित नाही. अवेळी पाणीपुरवठ्याने सर्वांचे हाल होत आहेत.

# समृध्दी एक्सप्रेस महामार्गावर आयशर ट्रकची उभ्या टेम्पोला धडक ;अपघातांची शृंखला सुरुच

## टेम्पोच्या चालकासह वाहकाचा घटनास्थळीच मृत्यू : चॅनल क्रमांक १०८ जवळ तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढोणा गावाजवळ अपघात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील समृध्दी एक्सप्रेस महामार्गावर चॅनल क्रमांक १०८/६०० वाढोणा गावाजवळ आयशर ट्रकने उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडक दिल्याने ट्रकचे टायर बदलविण्याचे काम करीत असलेल्या चालक व वाहकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.हा अपघात बुधवारला (ता.२६) घडला.

मिळालेल्या माहिती नुसार असे की, भिवंडी येथून सामान घेवून नागपूरच्या दिशेने टेम्पो क्रमांक एम .एच.०४- जे यु.३२०८ जात होता.दरम्यान समृध्दी एक्सप्रेस महामार्गावर चॅनल क्रमांक १०८/६०० वाढोणा गावाजवळ टेंपोचा टायर खराब झाल्याने या ट्रकचे टायर बदलाविण्याचे काम आसाम येथील बिलाल अहमद (३०),संतोषकुमार रामपाती करीत होते.दरम्यान मागून येणाऱ्या आयशर ट्रक क्रमांक एम. एच.१२- एम.व्ही.५६३० ने या ट्रकला जोरदार धडक दिल्याने चालक बिलाल अहमद (३०),संतोष कुमार रामपाती यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर धोंडगे,महामार्ग पोलिस प्रभारी माया चाटसे व त्याच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतकांना धामणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविले.तसेच ट्रक व टेंपो क्रेनच्या मदतीने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

आयशर ट्रक क्रमांक एम.एच.१२-एम.व्ही.५६३० चा चालक युवराज भाऊसाहेब ढोले (३०) रा. भासे,ता.कर्जत जि.अहिल्यानगर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास तळेगाव दशासर पोलीस करीत आहे.

# अचलपूर पोलीस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अचलपूर**

अचलपूर पोलीस स्टेशनच्या प्रांगणात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस नागरिक, पोलीस अधिकारी आणि शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजात शांतता व सलोखा कायम राहावा, परस्पर समन्वय वाढावा आणि कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरणार नाहीत यासाठी एकत्रित प्रयत्न करणे हा या बैठकीचा प्रमुख उद्देश होता.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अचलपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन मेहत्रे होते. त्यांच्यासोबत गुप्तचर विभागाचे अधिकारी, पोलीस स्टेशनचे कर्मचारी आणि अन्य पोलीस अधिकारी देखील उपस्थित होते.या बैठकीला शांतता समितीचे प्रमुख सदस्य कचरू सेट पटवारी, माणिक देशपांडे, राजू शर्मा, मस्तान भाई, वसीम भाई, कैसर भाई, पप्पू भाई, स्नेहल आळे, मोहन वावरे, सिद्धार्थ इंगळे आणि पत्रकार फिरोज खान मोहम्मद अझरुद्दीन , इर्शाद अहमद सय्यद असलम अन्य मान्यवर नागरिक उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी आणि शांतता समितीच्या सदस्यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले आणि समाजात शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**बैठकीत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा**

१. सामाजिक सलोखा टिकवणे - कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा गैरसमज टाळण्यासाठी जनजागृती करण्यावर भर देण्यात आला.

२. कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करणे - कोणतीही संशयास्पद किंवा अप्रिय घटना घडल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

३. धार्मिक आणि सामाजिक ऐक्य वाढवणे - सण-उत्सव किंवा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सर्व समाजातील लोकांनी एकत्र येऊन सौहार्द राखण्याचे ठरवण्यात आले.

४. सायबर गुन्हे आणि अफवा यावर नियंत्रण - सोशल मीडियावर पसरणाऱ्या अफवांपासून सावध राहण्याचे आणि नागरिकांमध्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्याचे ठरले.

**पोलीस प्रशासनाचा नागरिकांना संदेश**

ठाणेदार गजानन मेहत्रे यांनी नागरिकांना आवाहन केले की, समाजात शांतता टिकवण्यासाठी सर्वांनी मिळून कार्य करावे. कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना कळवावे. तसेच, कोणत्याही प्रकारच्या अफवांना बळी न पडता सत्य माहितीची खात्री करूनच पुढे पाठवावी.

या बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थित नागरिक आणि शांतता समितीच्या सदस्यांनी सामाजिक ऐक्य आणि सहकार्याची भावना ठेवून कार्य करण्याची प्रतिज्ञा घेतली.

# मंत्री साहेब आमचे वर्ग बंद करु नका,आम्हचे शिक्षण थांबवु नका

## राज्याच्या शिक्षणमंत्र्यांना विद्यार्थांचे पत्रातुन साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**



संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करण्यासाठीच्या रचनात्मक चळवळीचा भाग म्हणून जोडलेल्या मजकुराचे पत्र मा. शालेय शिक्षण मंत्र्यांना विद्यार्थ्यांकडून पाठवायचे आहे. सदर पत्र कितीही पटसंख्या असणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांनी पाठवायचे आहे. राज्यभरातून विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने पत्र जावीत ही अपेक्षित म.रा.प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी व्यक्त केले.सदर पत्राचा खूप फायदा व परिणाम होईलच असे नाही. मात्र रचनात्मक चळवळीचा हा एक महत्त्वाचा भाग ठरू शकतो.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगीतले.तसेच शाळा व्यवस्थापण समिती व ग्राम पंचायतचा ठराव शासनाला पाठवावा अशी विनंती शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केले आहे.

१५ मार्च २०२४ शासन निर्णयानुसार २०२४-२५ संच मान्यता अंतिम करण्यात आली आहे. शिक्षण कायद्यातील तरतुदीच्या व २८ ऑगस्ट २०१५ (सुधारित ८ जानेवारी २०१६) विसंगत अशा शासन निर्णयाने शाळांमध्ये शिक्षकच असणार नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे राज्यात हजारो शिक्षक तर अतिरिक्त होतीलच; परंतु शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडसर निर्माण होणार आहे. शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने / अत्यंत कमी शिक्षक उपलब्ध असल्याने पालकांना आपल्या पाल्यांना परगावच्या शाळेत दाखल करणे क्रमप्राप्त होईल त्यातून प्रामुख्याने किशोरवयीन मुला-मुलींच्या शिक्षणाची परवड होईल व मुलींची सुरक्षितता धोक्यात येण्याची स्थिती आहे. सोबतच बाहेरगावी दररोज जाणे-येणे करण्याचे स्थितीमुळे गळतीचे प्रमाण वाढेल. या संबंधाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाचे पत्र क्र. एसएसएन-२०१५/(प्र.क्र.१६/१५)/टीएनटी-२ दि. १०/०३/२०२५ नुसार इयत्ता ६ वी ते ७/८ वीची पटसंख्या २० किंवा २० पेक्षा कमी असल्यास १ नियमित शिक्षक मंजूर केला आहे. परंतु सदर बाब सुद्धा शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीस विसंगत आहे.बालकांचे शैक्षणिक नुकसान करणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय अद्यापही रद्द करण्यात आलेला नाही. राज्यातील शाळांतील शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा व स्वतःच्या गावातील शिक्षण मिळवण्याचा हक्क डावलणारा शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी संदर्भित-१ नुसार दिलेल्या नोटिसनुसार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने १७ मार्च २०२५ रोजी संपूर्ण राज्यातुन आंदोलन केले होते.आता हा नविन उपक्रम शिक्षक समितीने हातात घेतला आहे.या पत्र व्यवहारातुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास सर्वोच्च प्राधान्य देऊन सदर बाबतीत मागणीनुसार निर्णय घ्यावा अश्या मागणीचे पत्र मा.शिक्षणमंत्र्यांना विद्यार्थी पाठवणार आहे.असे पत्र पाठविण्याची विनंती शिक्षक समितीचे शिक्षक नेते गोकुलदास राऊत जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, .तथा समस्त कार्यकारिणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा शाखा- अमरावती यांनी केली आहे.

### पत्रातील मजकुर मा. शालेय शिक्षण मंत्री साहेब, सप्रेम नमस्कार

कमी पटामुळे आमच्या शाळेतील शिक्षक कमी होणार असे कळले आहे. आम्हाला गावातच शिकवण्यासाठी शिक्षक राहू द्या. कमी शिक्षक असले तर आमचे शिक्षण होणार नाही. बाहेरगावी जाण्यामुळे त्रास होईल व शिक्षण बंद होईल. पुरेसे शिक्षक असले तरच आमचे शिक्षण चांगले होऊ शकते. आमचे शिक्षण थांबवू नका. तुम्ही आमच्या हिताचा नक्कीच विचार कराल असा विश्वास आहे.

जय हिंद, जय महाराष्ट्र

**आपला लाडका विद्यार्थी / आपली लाडकी विद्यार्थीनी**

# बडनेरा शहरात पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न नागरिकांचा मजीप्रा कार्यालयात आक्रोश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**



गेल्या दोन-तीन महिन्यांपासून बडनेरा शहरात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आठवडाभर नळांना पाणीच येत नसल्याने संतप्त नागरिकांनी आज भाजप प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली मजीप्रा कार्यालयात धडक दिली.नागरिकांनी नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठ्याची मागणी करत अधीक्षक अभियंत्यांची भेट घेतली. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईमुळे लोकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे.शहरातील नागरिकांना किमान एक दिवस आड तरी नियमित पाणीपुरवठा मिळावा, यासाठी आम्ही प्रशासनाकडे मागणी केली आहे. जर लवकरच उपाययोजना केल्या नाहीत, तर नागरिक रस्त्यावर उतरतील,असा इशारा शिवराय कुलकर्णी यांनी दिला.

# स्व.रजिदंर कौर हरभजनसिंग यांना भावपुर्ण श्रद्धांजली देण्याकरिता गंगा सावित्री निवासस्थानी सांत्वना बैठकीचे आयोजन

## दि.२७, २८ व २९ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते १ व सायंकाळी ५ ते ८ या कालावधीत होणार सांत्वना बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**



अमरावती जिल्ह्याच्या मा.खा.नवनित रवि राणा यांच्या मातोश्री व आ.रवि राणा यांच्या सासु स्व.रजिदंर कौर हरभजनसिंग यांचे १२ मार्च २०२५ रोजी मुंबई येथील लिलावती रुग्णालयामध्ये निधन झाले. मुंबई येथील निवासस्थानी स्व.रजिदंर कौर हरभजनसिंग यांना श्रद्धांजली देण्याकरिता अनेक मान्यवरांनी सांत्वना भेट दिली होती. त्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्याच्या मा.खासदार या नात्याने अमरावती जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना व नागरिकांना नवनित राणा यांच्या मातोश्रींना श्रद्धांजली देण्याकरिता नवनित राणा यांना सांत्वनापर भेट देता यावी. याकरिता गंगा सावित्री निवासस्थानी स्व.रजिदंर कौर हरभजनसिंग यांना श्रद्धांजली देण्याकरिता दि.२७,२८ व २९ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते १.०० वाजेपर्यंत व सायंकाळी ५ ते ८ या कालावधी मध्ये सांत्वना बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या सांत्वना बैठकीमध्ये स्वत: मा.खा.नवनित रवि राणा व आ.रवि राणा हे उपस्थित राहणार आहे.

# सुट्टीच्या तीन दिवसांतही होईल राज्यभर दस्तनोंदणी; खरेदी-विक्रीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

रेडिरेकनरच्या दरात १ एप्रिलपासून १० टक्के दरवाढ होत असल्याने खरेदी-विक्री व्यवहारासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात गर्दी होत आहे. त्यातच मार्चअखेरीस तीन दिवस सुट्या आहेत. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालये २९, ३० व ३१ मार्च रोजी सुरू राहतील, तसे आदेश नोंदणी महानिरीक्षकांनी सोमवारी दिले आहेत.

नोंदणी व मुद्रांक विभाग हा राज्य शासनाला सर्वाधिक महसूल देणारा विभाग आहे. महसूल वसुलीत हा विभाग राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. या विभागात जनतेच्या स्थावर मालमत्तांच्या दस्तांची नोंदणी केली जाते व त्याचे अभिलेख सुरक्षित केले जातात. या विभागाने मागील वर्षात ५५ हजार कोटी रुपयांचा महसूल तिजोरीत जमा केला.

## २९, ३० व ३१ मार्च रोजी कार्यालये राहणार सुरू



अनेक सुट्यांच्या दिवशी या विभागातील कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावले आहे. आताही सर्व अधिकारी, कर्मचारी महसूल वृद्धीसाठी सेवा देतील. नागरिकांनी संधीचा लाभ घ्यावा व आपल्या दस्तांची नोंदणी करावी.

**-अनिल भा. औतकर, मुद्रांक जिल्हाधिकारी, अमरावती व वाशिम**

**२९, ३० व ३१ मार्च रोजी कार्यालये राहणार सुरू**

मार्च महिन्याच्या शेवटी २९ ते ३१ तारखेला सार्वजनिक सुट्या येत आहेत. त्यामुळे या दिवशी जनतेची गैरसोय होऊ नये व त्यांना दस्तनोंदणी सहज करता यावी. यासाठी नोंदणी महानिरीक्षक उदयराज चव्हाण यांनी राज्यातील सर्व नोंदणी कार्यालये २९, ३० व ३१ मार्च २०२५ रोजी सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. नोंदणी व मुद्रांक विभागस यंदा ६० हजार कोटींचे लक्ष्य दिले आहे.

# अचलपूर तहसील कार्यालयाद्वारे समपहरण केलेल्या मालमत्तेचा लिलाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २६ अमरावती**

थकबाकी न भरल्यामुळे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेचा लिलाव अचलपूर तहसील कार्यालय करणार आहे. किसन शिवरामजी खेरडे यांच्या वारसांकडून येणे असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीसाठी ही कारवाई करण्यात येत आहे.

मौजा कांडली येथील भू-मापन क्रमांक ११२/२ मधील चार भूखंडांचा लिलाव होणार आहे. या भूखंडांचा दि. २८ मार्च रोजी दुपारी १२ वाजता तहसील कार्यालय, अचलपूर येथे जाहीर लिलाव होणार आहे. या मालमत्तांवर असलेले सर्व भार, अनुदान आणि करार रद्द करण्यात आले आहेत. याबाबत अधिक माहिती आणि लिलाव प्रक्रियेच्या तपशीलांसाठी अचलपूर तहसील कार्यालयाशी संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.